25
12/05/2021

क्रमांक/तलाठी आस्था/कावि/ 109/2021
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
दिनांक ~~एप्रिल, 2021~~ 03/05/2021

प्रति,

1)भारस्थ अधिकारी,------------------------ जि.का.यवतमाळ
2)उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),---------------------- जि.का.यवतमाळ
3)तहसिलदार,------------------------- (सर्व)

**विषय :-** **जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे आस्थापनेवर कार्यरत मंडळ अधिकारी संवर्गाची दिनांक 01-01-2021 ची अंतिम जेष्ठतासूची प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ :-** 1) शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:एसआरव्ही-1076/12, दिनांक 21-06-1982
2)शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-एसआरव्ही-2011/प्र.क्र.284/12, दिनांक 21-10-2011
3) या कार्यालयाचे पत्र क्रमांक/तलाठी आस्था/कावि/13/2021, दिनांक 14-01-2021

0000000

उपरोक्त विषयावरील संदर्भीय शासन अधिसुचना व शासन निर्णयातील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे आस्थापनेवर कार्यरत मंडळ अधिकारी संवर्गाची दिनांक 01-01-2021 ची तात्पुरती जेष्ठतासूची या कार्यालयाचे संदर्भीय पत्र दिनांक 14-01-2021 अन्वये प्रसिध्द करण्यात येवून सदर जेष्ठतासूचीवर मंडळ अधिकारी यांचेकडून आक्षेप/हरकती मागविण्यात आले.

त्यानुसार मंडळ अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेले आक्षेप निकाली काढण्यात येवून जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे आस्थापनेवर कार्यरत मंडळ अधिकारी संवर्गाची दिनांक 01-01-2021 ची अंतिम जेष्ठतासूची प्रसिध्द करण्याकरिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

तरी आपणास कळविण्यात येते की, सदर जेष्ठतासूची आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या संबंधित मंडळ अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी व एक प्रत आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी. तसेच याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र :- आक्षेप निकाली काढण्याचे विवरणपत्र**
**व अंतिम जेष्ठतासूची**

**(अमोल येडगे)**
**जिल्हाधिकारी यवतमाळ**

**प्रतिलिपी :-** **मा.विभागीय आयुक्त, अमरावती (महसूल शाखा) यांना माहितीकरिता सविनय सादर.**
**प्रतिलिपी :-** **माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित.**

3) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, यवतमाळ यांना सुचित करण्यात येते की, सदर जेष्ठतासूची जिल्ह्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.
4) अध्यक्ष/सचिव, विदर्भ मंडळ अधिकारी संघ, जिल्हा शाखा-यवतमाळ यांना माहितीकरीता.

**(अमोल येडगे)**
**जिल्हाधिकारी यवतमाळ**

## जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे आस्थापनेवर कार्यरत मंडळ अधिकारी संवर्गाची दिनांक 01.01.2021 ची तात्पुरती जेष्ठतासूचीवर आलेले आक्षेप निकाली काढणेबाबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव व कार्यरत ठिकाण | जेष्ठता क्रमांक | आक्षेपाचे विवरण | आक्षेपावरील स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.डी.यु.मनवर, मंडळ अधिकारी तहसिल कार्यालय, नेर | 73 | दिनांक 03.01.2015 रोजी प्रसिध्द झालेल्या तलाठी जेष्ठता यादीची अंमलबजावणी करून मंडळ अधिकारी संवर्गाची सेवाजेष्ठता यादी दिनांक 01.01.2021 मध्ये अनुक्रमांक 1 वरील श्री.आर.एम.पंधरे यांच्या नंतरची जेष्ठता देण्यात यावी. तसेच जन्मतारीख दिनांक 17.07.1968 असून तशी दुरूस्ती करण्यात यावी. | जेष्ठतासूची मध्ये जन्मतारीख दिनांक 17.07.1968 अशी दुरूस्ती करण्यात आली आहे.<br>जिल्हाधिकारी कार्यालयाने तलाठी संवर्गातुन मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी दि.03.01.2015 रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारीत जेष्ठतासूची विरूध्द मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहे. सदर तलाठी जेष्ठतासूचीला मा.न्यायालयात आव्हान देण्यात आलेले असून प्रकरणात जेष्ठतासूची न्यायप्रविष्ट आहे. उक्त प्रलंबित न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. सबब आक्षेप निकाली काढण्यात येत आहे. |
| 2 | श्री.आर.टी.राठोड, मंडळ अधिकारी तहसिल कार्यालय, महागांव | 81 | दिनांक 03.01.2015 रोजी प्रसिध्द झालेल्या तलाठी जेष्ठता यादीची अंमलबजावणी करून मंडळ अधिकारी संवर्गाची सेवाजेष्ठता यादी दिनांक 01.01.2021 मध्ये अनुक्रमांक 1 वरील श्री.आर.एम.पंधरे यांच्या नंतरची जेष्ठता देण्यात यावी. | जिल्हाधिकारी कार्यालयाने तलाठी संवर्गातुन मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी दि.03.01.2015 रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारीत जेष्ठतासूची विरूध्द मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहे. सदर तलाठी जेष्ठतासूचीला मा.न्यायालयात आव्हान देण्यात आलेले असून प्रकरणात जेष्ठतासूची न्यायप्रविष्ट आहे. उक्त प्रलंबित न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. सबब आक्षेप निकाली काढण्यात येत आहे. |
| 3 | श्री.जी.एस.राउत, मंडळ अधिकारी तहसिल कार्यालय कळंब | 84 | दिनांक 03.01.2015 रोजी प्रसिध्द झालेल्या तलाठी जेष्ठता यादीची अंमलबजावणी करून मंडळ अधिकारी संवर्गाची सेवाजेष्ठता यादी दिनांक 01.01.2021 मध्ये अनुक्रमांक 3 वरील श्री.आर.व्ही.वानखडे यांच्या नंतरची जेष्ठता देण्यात यावी. | जिल्हाधिकारी कार्यालयाने तलाठी संवर्गातुन मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी दि.03.01.2015 रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारीत जेष्ठतासूची विरूध्द मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहे. सदर तलाठी जेष्ठतासूचीला मा.न्यायालयात आव्हान देण्यात आलेले असून प्रकरणात जेष्ठतासूची न्यायप्रविष्ट आहे. उक्त प्रलंबित न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. सबब आक्षेप निकाली काढण्यात येत आहे. |

(अमोल येडगे)
जिल्हाधिकारी, यवतमाळ